# प्रेसनोट

जा.क्र.५७० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३ / ०८ / २०१७

## ''मोबाईल पोलीस स्टेशन''
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा:– आज दिनांक १२ / ०८ / २०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा, यांचे संकल्पनेतुन साकारण्यात येत असलेले फिरते पोलीस स्टेशन या कार्याक्रमाचे अध्यक्ष मा. पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता साहु, तसेच मा. उपविभागीय (गृह) सुनिल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी साकोली दिसले, पोलीस निरीक्षक घुसर स्थागुशा उपस्थिती दर्शवली असुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथील खैरी/ पांधी तसेच भंडारा येथील बेला, लाखनी येथील गडेगाव याठिकाणी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ. स्वाती पुरोहीत, तिरपुडे कॉलेज ऑफ सोशल सायंस नागपुर हयासुध्दा आपले ऑडीट पथक सह हजर होत्या.

मा. पोलीस अधीक्षक सा. भंडारा यांनी आपले भाषणात सांगितले की, मुली विषयी तहसील ठिकाणी महीला प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले. आहे. त्याठिकाणी मुलींना सहभागी होणेस मदत करा. महिला अत्याचार थांबायला पाहीजे. पालकांनी आपल्या मुलींना मैत्रीची भावना ठेवुन त्याचेशी वागणुक ठेवायला पाहीजे. गावात होणारे लहान भांडणामुळे पुढे मोठे स्वरुपाचे गुन्हे घडतात. त्यामुळे गावातील तंटे वेळीच मिटविण्याकरीता फिरते पोलीस स्टेशन तयार करण्यात आले आहे. गावातील कोणतीही तक्रार असली जरी ती दुस–या विभागाशी संबंधीत असली तरी पोलीस स्टेशनला कळविणे त्याचप्रमाणे फेसबुक, व्हाटॲप, या माध्यमातुन मुलींची होणारी फसवणुक, फटाक्यामुळे होणारे प्रदुषण, आर्थीक फसवणुक जेष्ठ नागरीक सुरक्षा, गावकरी यांच्या अडीअडचणी व तसेच वैयक्तिक समस्या ऐकुण त्यांना उपयुक्त कायदेशीर मार्गदर्शन केले. सदर नुक्कड पोलीस स्टेशन कार्यक्रम दरम्यान उपस्थित नागरिकांना आयोजित नुक्कड पोलीस स्टेशनचे संकल्पने बाबत माहिती देण्यात आली. तसेच पोलीस बॉईज संघटनाच्या वतीने कलापथका व्दारे पथनाटय सादर करण्यात आले.

तसेच कार्यक्रमाला पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष सामाजीक कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य, जि. प सदस्य गावातील जनसमुदाय व शाळकरी मुले फिरते पोलीस स्टेशन कार्यक्रमात सहभाग होते.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.